[८] रा. प. कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील फक्त एका अवलंबितास या योजनेचा लाभ घेता येईल.

[९] अनुकंपा योजनेखाली नियुक्ती देण्यात यावयाच्या पदासाठी उमेदवाराने संबंधित पदासाठी महामंडळाने विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयाची अट, अनुभव इत्यादी सर्व अटी पूर्ण करणे आवश्यक राहील.

[१०] विधवा उमेदवाराच्या बाबतीत त्या वर्ग-३ चालक संवर्ग, वर्ग-४ पदाकरीता इतर सर्व अर्हता पूर्ण करीत असल्यास वयाची कमाल मर्यादा ४५ वर्षे राहील.

[११] अनुकंपा तत्वावर नेमणुकीसाठी इच्छुक असणारे अवलंबित जर अल्पवयीन असतील तर त्यांच्या वयाची २५ वर्षे पूर्ण होईपर्यंत ते इतर अटी व अर्हता पूर्ण करीत असल्यास अनुकंपा तत्वावर नेमणुकीसाठी हक्कदार राहतील.

[ब] कर्मचारी रा. प. सेवेत असतांना परंतु ड्युटीवर नसतांना आलेला मृत्यु :

या "ब" प्रकारातील कर्मचाऱ्यांवर अवलंबित असलेल्या व्यक्तीस खालील अटी लागु राहतील.

१] संबंधित मूळ कर्मचाऱ्याची महामंडळामध्ये किमान ५ वर्षे सेवा झालेली असावी. सदर पाच वर्षे सेवाकाळ मोजतांना रोजंदारीवरील सेवा तसेच समय वेतनश्रेणी वरील सेवा यांचा विचार करण्यात येईल.

२] वरील ३-अ अंतर्गत लागु असलेल्या इतर अटी क्र. २ ते ११ तंतोतंत लागु राहतील.

[क] गंभीर आजारामुळे कायमचे अपात्र.

कर्क रोग, क्षय रोग, अर्धांग वायु आणि शारीरिकदृष्ट्या कायमचे अपंगत्व अशा प्रकारच्या गंभीर आजारामुळे वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरल्यामुळे रा. प. सेवेतून कमी केलेल्या [ Medically unfit ] कर्मचाऱ्याच्या एका अवलंबितास अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज करता येईल. तसेच या गटातील कर्मचाऱ्याने क्षय रोग, कर्क रोग अशा प्रकारच्या वर उल्लेख केलेल्या गंभीर आजारामुळे वैद्यकीयदृष्ट्या कायमचे अपात्र असण्याबाबत सक्षम मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहणार आहे. त्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यास मेडिकल बोर्डाकडे प्रशासनाकडून पाठविण्यात यावे.

सदरच्या निकषाखाली मोडणाऱ्या अवलंबित व्यक्तीस अनुकंपा तत्वावर नोकरी मिळविण्यासाठी वरील "३-अ" गटातील २ ते ११ व "ब-१" मधील अटी लागु राहतील.

[ड] दृष्टी चिकित्सेत अपात्र ठरलेले चालक :

दृष्टी चिकित्सा चाचणीमध्ये जे चालक वैद्यकीयदृष्ट्या अपात्र ठरतात व त्यामुळे ते चालकाची सेवा करण्यास असमर्थ असल्यामुळे सेवा खंडित करण्यात येते अशा अपात्र चालकांना पर्यायी नोकरी देता येईल. अशा कर्मचाऱ्यांनी तसा लेखी अर्ज महामंडळाकडे करावा.

या योजनेखालील अवलंबित व्यक्तीस अनुकंपा तत्वावर नोकरी मिळविण्यासाठी वरील ३-अ गटातील विहित केलेल्या २ ते ११ व "ब-१" मधील अटी लागु राहतील.

[इ] भूसंपादन कायद्याखाली भूमिहीन झालेल्या व्यक्ती :

ज्या व्यक्तींच्या जमिनी रा. प. महामंडळाने भूसंपादन कायद्याखाली घेतल्यामुळे ते भूमिहीन झाले आहेत त्यांच्या अवलंबितांना अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज करता

....४